# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte org.in Internet :http/www.dte.org.in


परिपत्रक

क्र.१०/एडीएम/पदविका/२०१२/८८५
दि. 5 SEP 2012

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.

विषय : शासकीय/ अशासकीय अनुदानित संस्थेमधील बारावी नंतर च्या प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमातील समुपदेशन फेरीनंतर (तिसरी फेरी) रिक्त राहिलेल्या जागा संस्थास्तरावर भरणेबाबत...

उपरोक्त विषयाच्या संदर्भात नमुद करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये शासकीय/ अशासकीय अनुदानित संस्थेत बारावी नंतर प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमात समुपदेशन फेरीनंतर काही जागा रिक्त आहेत.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, सदर रिक्त जागा दि. १०.०९.२०१२ पर्यंत खालील अटीच्या अधीन राहुन भरण्याची परवानगी देण्यात येत आहे

१. संबंधित शासकीय/अशासकीय अनुदानित संस्थांनी त्यांच्या संस्थेतील रिक्त जागांची शाखानिहाय माहिती स्थानिक वृत्तपत्रांमधुन प्रसिध्दी देऊन विद्यार्थ्यांकडुन अर्ज मागविण्यात यावेत व त्यांची गुणवत्ता यादी तयार करावी.
२. ज्या विद्यार्थ्यांची नांवे केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेच्या गुणवत्ता यादी आहेत अशा विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रथम प्रवेश देऊन नंतर उर्वरित विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी तयार करुन त्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात यावा.
३. ज्या विद्यार्थ्यांनी यापुर्वी केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेमधुन (CAP I, II, III) प्रवेश निश्चित केले आहेत असे विद्यार्थी उपरोक्त प्रवेश फेरीसाठी पात्र ठरणार नाहीत.

तसेच शासकीय/ अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्थांनी सदर प्रक्रियेतील प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची यादी या संचालनालयाच्या संकेतस्थळावर दि. १५/०९/२०१२ पर्यंत अपलोड करण्यात यावी.

तरी, याबावत कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील बारावी नंतरच्या प्रथत वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या सर्व शासकीय/ अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्थाच्या निदर्शनास सदर बाब आणुन प्रवेश प्रक्रिया पुर्ण करुन घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य.

---

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती
क्र.विकाअ/शिक्षण/२०१२/2820
दिनांक :- 10/9/2012

प्रति,

प्राचार्य,
सर्व शासकीय / अनुदानित / विना-अनुदानित
पोस्ट एच एस सी पदविका संस्था.

आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रामध्ये दिलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करावी.

S.P. Posebard
सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती

प्रत :- प्रक्रिया योजक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळी टाकण्याकरीता.